सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, ०६ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३१२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हा विकासासाठी भरीव निधी देणार : अजित पवार

छत्रपती संभाजीनगर, दि.५ : जिल्ह्याचा सन २०२५-२६ चा आराखडा हा १२०० कोटी रुपयांचा तयार करण्यात आला आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी शासन भरीव निधीची तरतूद करेल. प्राप्त निधीचा विनियोग हा दर्जेदार, गुणवत्तापूर्ण कामे करावा,असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त आणि नियोजन, राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी आज दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ (सर्व साधारण) च्या राज्यस्तरीय बैठकीत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या आढावा घेतला. बैठकीस राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागासवर्ग कल्याण मंत्री अतुल सावे, वित्त विभागाचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल, पालक सचिव हर्षदीप कांबळे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे हे दूरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. तर जिल्हा मुख्यालयातून आ. रमेश बोरनारे, आ. अनुराधाताई चव्हाण, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड तसेच सर्व यंत्रणाप्रमुख आदी उपस्थित होते.



### लोकसंख्येची वाढ पाहता वाढीव निधीची पालकमंत्र्यांची मागणी

पालकमंत्री शिरसाट यांनी सांगितले की, जिल्ह्यात येऊ घातलेली औद्योगिक गुंतवणूक पाहता येत्या पाच वर्षात शहराची लोकसंख्या वाढणार आहे. त्यादृष्टीने तयार करावयाच्या पायाभुत सुविधा विकास व अन्य आवश्यकतांसाठी वाढीव नियोजन करण्यात आले आहे.तसेच जिल्ह्यातील ५० टक्के लोकसंख्या शहरी भागात राहत आहे. त्यामुळे नागरी सुविधा विकासासाठी निधी मिळावा,अशी मागणी पालकमंत्र्यांनी केली.

### सौर उर्जेच्या वापरासाठी स्वतंत्र तरतूद करावी : अतुल सावे

इमाव कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले, पर्यटनाला चालना देण्यासाठी जिल्ह्यात अधिक सुविधांचा विकास होणे आवश्यक असून त्यासाठी अधिक निधी मिळावा. तसेच सौर उर्जेचा अंगिकार करण्याबाबत आर्थिक तरतूद करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

### खर्चाचा आढावा

उपमुख्यमंत्री पवार यांनी सन २०२४-२५ च्या मंजूर नियतव्ययाचा खर्चाचा आढावा घेतला. जिल्ह्याला सन २०२४-२५ साठी ६६० कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर असून ५१६ कोटी रुपयांच्या कामांच्या प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत. त्यातील २२५ कोटी निधी प्राप्त झाला असून त्यातील १८७ कोटी रुपये निधी खर्च झाला आहे.

१२०० कोटी रुपयांचा आराखडा

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सादरीकरण करुन जिल्ह्याच्या सर्वसाधारण योजनांसाठी १२०० कोटी रुपयांचा आराखडा सादर केला. त्यात प्रामुख्याने जिल्ह्यातील विविध प्रमुख कामांसाठी निधीची मागणी करण्यात आली. शहरी सुविधांचा विकास, जिल्ह्यात रेशीम उत्पादन वाढीला चालना देणे, घृष्णेश्वर विकासासाठी १५६.६३ कोटी रुपयांचा विकास आराखडा अशा विविध विकासकामांचा व योजनांचा त्यात समावेश आहे.

# महाकुंभमेळ्यात पंतप्रधान मोदींचं अमृतस्नान!



प्रयागराज : प्रयागराजमध्ये सुरु असणाऱ्या महाकुंभमेळ्यात जगभरातील भाविक सहभागी होत आहेत. २६ फेब्रुवारीला महाशिवरात्रीपर्यंत महाकुंभ सुरू राहणार आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह अनेक बड्या नेत्यांनी महाकुंभला भेट दिली आहे. तर आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील महाकुंभमेळ्यात हजेरी लावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज प्रयागराज दौऱ्यावर असून यादरम्यान, तेथे सुरू असलेल्या महाकुंभमध्ये पोहोचल्यावर संगमामध्ये पवित्र स्नान केले आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज नांदेडात सभा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०५ फेब्रुवारी**



राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उद्या दि. ६ फेब्रुवारी रोजी नविन मोंढा येथील मैदानात दुपारी १ वाजता जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उद्या दुपारी १२ वाजता मुंबई येथून विमानाने नांदेड विमानतळावर दाखल होणार आहेत. दुपारी १२:३० पर्यंत विश्रामगृह मार्गावर त्यांचे स्वागत केले जाणार आहे.

यानंतर शिवसेनेचे सर्व आमदार व पदाधिकाऱ्यांसोबत ते सचखंड गुरुद्वाऱ्यात दर्शन घेणार आहेत. दुपारी १ ते ३ पर्यंत नवा मोंढा येथील मैदानावर नागरीक व लाडक्या बहीणींचे आभार व्यक्त करण्यासाठी होणाऱ्या सभेस संबोधित करणार आहेत. सायंकाळी ५ वाजता शिवमळा मरळक फाटा येथे आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसोवत बैठक होणार आहे.

# बिबट्याचा विजेचा शॉक लागून मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर ,दि. ०५ फेब्रुवारी**

हिमायतनगर तालुक्यातील चिंचोर्डी शिवारात पाण्याच्या शोधात आलेल्या बिबट्याचा भक्ष्या शोधात शॉक लागून मृत्यू झाला आहे. हि घटना दिनांक ४ रोजी मंगळवार सकाळी उघडकीस आली आहे. दरम्यान वनविभागाने घटनास्थळी दाखल होवून पंचनामा केला.

हिमायतनगर तालुक्यात बिबट्या चा वावर असल्याने चांगल्या प्रकारे सागवान व अन्य मोल्यवान झाडे असून मोठ्या प्रमाणात जंगल अस्तित्वात आहे. या जंगलात बिबट्याचे वास्तव्या मुळे भिती पोटी चोरटे जंगलात झाडे तोडत नाहीत भुकेने व्याकूळ बिबट्या भक्ष्य शोधण्यासाठी फिरत असताना नाल्याच्या कडेला एका झाडावर वानरांचा कळप दिसला. त्याच क्षणी त्यांने झाडांवर चढून एका वानरांच्या पिल्लास भक्ष्य केले. तेच भक्ष्य जबड्यात पकडून, बिबट्या झाडावरून खाली



उतरत असताना त्याचा झाडाशेजारील लागून असलेल्या ११ केव्ही विजेच्या ताराला स्पर्श झाल्याने बिबट्यास विजेचा जबरदस्त शॉक लागला त्याच क्षणी त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे सध्या जंगलातील सर्वच ठिकाणाच्या नैसर्गिक पाणवठ्याचे बाष्पीभवन झाले असल्याने वन्य प्राण्यांना जंगलात पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. त्याकरिता वनविभागाने पानवटे तयार करने गरजेचे आहे

प्राथमिक स्वरूपात सदर बिबट्याचा मृत्यू हा विजेचा शॉक लागून झाला असे सांगण्यात येते आहे. परंतू जंगलातील ए. ग्रेडचा प्राणी हा बिबट्या असल्याने या बिबट्याचा मृत्यूचे कारण शोधणे अतिशय गरजेचे असून वरिष्ठांनी या गंभीर बाबींकडे लक्ष द्यावे. अशी मागणी वन्यप्रेमी जनतेतून केली जात आहे . बिबट्याने ज्या वानरांच्या पिल्लाला भक्ष्य केले होते. त्या वानराच्या पिलाचाही मृत्यू झाला आहे. घटनेची माहीती मिळताच जिल्हाउपवन संरक्षक केशव वाबळे, सहाय्यक उपवनसंरक्षक ठाकूर, वनपरिक्षेत्र अधिकारी बालाजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिमंडळ अधिकारी अमोल कदम, वनरक्षक वानोळे, वनमजूर शेख अहेमद हे घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान मयत बिबट्याचे शवविच्छेदन करण्यासाठी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. योगेंद्र येवतीकर, डॉ. उमेश सोनटक्के यांना पाचारण करण्यात आले. शवविच्छेदनानंतर अंतिमसंस्काराचा करण्यात आला.

# वारकरी संप्रदायाचे वैचारिक नेतृत्त्व शिरीष महाराज मोरे यांचे निधन



पुणे, दिनांक ५ फेब्रुवारी : वारकरी संप्रदायातील वैचारिक नेतृत्व आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज ह.भ.प. शिरीष महाराज मोरे (वय ३०) यांचे आकस्मित निधन झाले. श्रीक्षेत्र देहूगाव येथील वैकुंठ स्मशानभूमीत आज (बुधवार, दिनांक ५ फेब्रुवारी) सायंकाळी चार वाजता अंत्यविधी होणार आहे.

वारकरी संप्रदायाचे एक समर्थ नेतृत्व पडद्यामागे गेल्याने समाज जीवनाच्या सर्वच क्षेत्रांतून हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनाने इतिहास आणि संत साहित्य विश्वातला एक जाणकार हरपला. समस्त हिंदू समाज आणि हिंदुत्वविषयक अभियानांचे मोठे नुकसान झाल्याची खंत शिवशंभू विचार मंचाचे महाराष्ट्र राज्य संयोजक सुधीर थोरात यांनी व्यक्त केली. महाराष्ट्रातील हजारो तरुणांना हिंदुत्व चळवळीशी जोडण्याचे काम शिरीष महाराज मोरे यांनी केले. त्यांनी नुकत्याच झालेल्या विशाळगड मुक्ती संग्रामात आक्रमी भूमिका घेत प्रशासनाला न्याय देण्यास भाग पाडले. बालपणापसूनच ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक होते. प्रखर वक्ते, संत साहित्याचे जाणकार, विशेषतः डाव्या पुरोगामी चळवळीकडून संत विचारांची जी चुकीची मांडणी केली जात आहे. त्याविषयी त्यांनी वेळोवेळी योग्य आणि अभ्यासपूर्ण भूमिका मांडली होती.

# बांगलादेशी घुसखोरांचा बीएसएफ जवानांवर हल्ला

## बीएसएफने पिटळून लावले सशस्त्र घुसखोरांना

कोलकाता, ०५ फेब्रुवारी : सशस्त्र घुसखोरांनी ४ आणि ५ फेब्रुवारीच्या मध्यरात्री भारत-बांगलादेश सीमेवर तैनात सीमा सुरक्षा दलाच्या जवानांवर २ वेळा हल्ले केल्याची घटना घडली. मोठ्या संख्येने काठ्या, कटर आणि शस्त्रे घेऊन आलेल्या बांगलादेशींनी बीएसएफ जवानांवर हल्ला चढवला. त्यानंतर जवानांनी स्वसंरक्षणार्थ गोळीबार करत त्यांना पिटाळून लावले. या धुमश्चक्रीत एका घुसखोराला बीएसएफ जवानांनी ताब्यात घेतले आहे.

मध्यरात्रीचा अंधार आणि धुके याचा फायदे घेऊन भारतात शिरण्याचा प्रयत्न करणाऱ्या घुसखोरांनी सीमा सुरक्षा दलाच्या जवानांवर अवघ्या ६ तासांत दोन वेळा हल्ला झाला. पहिला हल्ला रात्री १२ वाजताच्या सुमारास झाला. त्यानंतर पुन्हा हल्ला चढवण्यात आला. तथापि, बीएसएफने त्यांनाही बेदम मारहाण केली. हे बांगलादेशी घुसखोरी आणि तस्करीच्या उद्देशाने दक्षिण दिनाजपूरमधील मलिकपूर गावात घुसले होते. बांगलादेशींनी बीएसएफ जवानांवर हल्ला केला. त्यांच्याशी कडकपणे वागून बीएसएफने गोळीबार केला. सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे बांगलादेशींनी बीएसएफ जवानांकडून शस्त्रे हिसकावण्याचा प्रयत्न केला. यामध्ये एक सैनिकही जखमी झाला आहे. सीमेजवळ दाट धुके होते. नंतर, बीएसएफ जवानांनी शोध घेतला तेव्हा एक बांगलादेशी जखमी अवस्थेत आढळला. जखमी बांगलादेशीला बीएसएफने तातडीने गंगारामपूर रुग्णालयात उपचारासाठी नेले. घटनास्थळावरून जळालेले तुकडे, काठ्या आणि वायर कटर जप्त करण्यात आले आहेत. जखमी बीएसएफ जवानांना वैद्यकीय सुविधा पुरवण्यात आल्या आहेत. बांगलादेशींनी भारतात प्रवेश करण्याचा प्रयत्न करण्याची ही पहिलीच वेळ नाही. बीएसएफ जवानांनी यापूर्वीही अनेक वेळा त्यांना सीमेवर रोखण्याचा प्रयत्न केला आहे.

### राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणच्या विरोधात बिडकीनकर संतप्त
# संभाजीनगर - पैठण राष्ट्रीय महामार्गावर पाच तास रास्ता रोको
### राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण प्रशासनाची प्रतिकात्मक प्रेतयात्रा

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ५. फेब्रुवारी : बिडकीन शहरातुन संभाजीनगर - पैठण राष्ट्रीय महामार्गाचे काम अनेक महिन्यांपासून कासवाच्या गतीने सुरू आसुन याचा बिडकीनकरांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्यामुळे महामार्गाचे काम तात्काळ पूर्ण करण्याची वेळोवेळी मागणी करुन देखील दुर्लक्ष केल्यामुळे नागरीकांनी आक्रमक होत महामार्गावर पाच तास रास्ता रोको आंदोलन करत राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण प्रशासनाची प्रतिकात्मक प्रेतयात्रा काढली.

संभाजीनगर - पैठण राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चे काम अनेक महिन्यांपासून सुरू आहे. हा महामार्ग बिडकीन शहराच्या मध्यवर्ती भागातून जातो. मात्र बिडकीन शहराची सुरुवात व शेवट आसलेल्या निलजगाव फाटा ते शेकटा फाटा दरम्यान महामार्गावर कोणतेच काम झालेले नाही. तसेच हा मार्ग संभाजीनगर महानगर पालिकाच्या जलवाहिनीच्या कामामुळे ठिक ठिकाणी उखाडलेला आहे यामुळे निलजगाव फाटा ते शेकटा फाटा दरम्यान २४ तास धुळीचे साम्राज्य पसरले आसते.

या महामार्गाचे काम तात्काळ पूर्ण करावे तसेच निलजगाव - बिडकीन मार्गावर बिडकीन शहराच्या हद्दीत गरजेच्या



### तुम्ही आलात कशाला?

संभाजीनगर पैठण महामार्गावर रास्ता रोको आंदोलन चालू झाल्यानंतर राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अधिकारी संघर्ष मेश्राम, अनिकेत कुलकर्णी, शेख वसीम आदी आंदोलकांशी चर्चा करण्यासाठी आले आसता आंदोलकांकडुन महामार्गाचे काम प्रत्यक्षात चालु होण्यापुर्वी निलजगाव फाटा ते शेकटा फाटा दरम्यान तात्काळ एका बाजुने डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली मात्र या अधिकाऱ्यांनी सदरील काम आमच्या हातात नाही असे उत्तर दिल्यानंतर मनोज पेरे यांनी तुम्ही येथे आलात कशाला ? आसे विचारत धारेवर धरले.

### लांबच लांब वाहनांच्या रांगा

निलजगाव फाट्यावर सकाळी १० वाजता रास्ता रोको आंदोलनास सुरुवात झाली होती. राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अधिकारी उशिराने आले व त्यानंतर आंदोलकांशी चर्चा केली यात पाच तास उलटून गेले, शेवटी दुपारी ३ वाजता राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर १५ दिवसांची मुदत देऊन आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. दरम्यान बिडकीन ते संभाजीनगर , बिडकीन ते पैठण व बिडकीन ते निलजगाव मार्गावर पाच ते सात किलोमीटर लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

ठिकाणी गतिरोधक बसविण्याच्या मागणीसाठी बिडकीनकर आक्रमक होत पाच तास रास्ता रोको आंदोलन केले. आंदोलना दरम्यान राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण प्रशासनाची प्रतिकात्मक तिरडी , प्रेतयात्रा काढुन रोष व्यक्त केला. मनोज पेरे , सरपंच अशोक धर्मे, विकास गोर्डे , माजी उपसरपंच लहु कातबने, अमोल कोथिंबीरे , किरण गुजर , सचिन हाडे, उमेश चौधरी, ज्ञानेश्वर कांबळे, अरविंद काळे , वामन साठे, उत्तम धर्मे , रमेश गवारे , अरविंद शेजुळ , योगेश छबिलवाड , अकाश हाडे , ऋतिक धर्मे , अमोल वंजारे , अंकुश धर्मे , अभिजित ढाकीफळे , राजु धर्मे , बाबु आवाज , मोहन हिवाळे , कल्याण शिंदे, मच्छिंद्र हाडे , देविदास चव्हाण,शिवाजी वंजारे, योगेश औटी, ड सतिष हाडे, किरण वंजारे, विष्णू काळे , हफिज्जोद्दीन इनामदार, संजय माने, किशोर हाडे, गणेश काळे , अजय भिवसने आदींसह हजारो बिडकीन नागरीक उपस्थित होते.

### अपघातास जबाबदार कोण?

गेल्या अनेक महिन्यांपासून संभाजीनगर - पैठण राष्ट्रीय महामार्ग व संभाजीनगर महानगर पालिका जलवाहिनीचे काम कासवाच्या गतीने सुरू आहे , यामुळे बिडकीन हद्दीत अनेक अपघात होऊन कित्येकांना प्राण गमवावे लागले आहेत , भविष्यात दुर्दैवाने अपघातात जिवीत हानी झाल्यास राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व संबंधित ठेकेदारावर गुन्हा नोंद करण्यात यावा अशी मागणी आंदोलकाकडुन करण्यात आली. तसेच उडणाऱ्या धुळीमुळे बिडकीनसह परिसरातील नागरिकांना दम्यासारख्या श्वसनाच्या आजारांना सामोरे जावे लागत आहे.

